**ठळक बातम्या**

- राज्यसरकारनं गेल्या दोन वर्षात, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबरोबरच सर्व समाजघटकांसाठी अनेक निर्णय घेतल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आजपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर

- राज्यात सोयाबीन आणि उडीद पिकांसाठी किमान हमीभावानं ९० दिवसांसाठी खरेदी केंद्रं सुरू करायला केंद्र सरकारची मान्यता

- गणेशोत्सवाचा सर्वत्र उत्साह, दीड दिवसाच्या गणपतींचं आज विसर्जन

**आणि**

- पॅरिस पॅरालिंपिक स्पर्धेचा आज समारोप, २९ पदकांसह भारतानं नोंदवली आत्तापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी.

**<><><><><>**

महायुती सरकारनं गेल्या दोन वर्षांत घेतलेले ६०० निर्णय सर्व समाजघटकांसाठी होते, मात्र मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लोकप्रियतेमुळं त्यांची फारशी चर्चा होत नाही, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. लाडकी बहीण योजनेला विरोध करणाऱ्यांवर त्यांनी टीका केली. सरकारनं ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, महिला, युवांसाठी आणलेल्या

योजनांचा पुनरुच्चार करून आपल्या सरकारचे हात अधिक बळकट करण्याचं आवाहन त्यांनी उपस्थितांना केलं.

देवाची आळंदी इथं झालेल्या वारकरी संतपूजन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मारुती महाराज कुरेकर यांना शांतिब्रह्म पुरस्कार, तर रामराव महाराज ढोक यांना तुलसीदास पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. वारकरी संप्रदाय आणि संतपरंपरा हे महाराष्ट्राचं वैभव आणि समाज घडवण्याचा कारखाना आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आजपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर येत आहेत. आज संध्याकाळी ते मुंबई समाचार या वृत्तपत्राच्या द्विशताब्दी निमित्त तयार केलेल्या लघुपटाचं अनावरण करतील. १८२२ मधे मुंबईत सुरु झालेलं हे गुजराती वर्तमानपत्र आशिया खंडातल्या सर्वात जुन्या वर्तमानपत्रांपैकी एक आहे. गृहमंत्री शाह उद्या दिवसभर मुंबईतल्या विविध भागातल्या गणेश मंडळांना भेट देणार आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या सागर निवासस्थानी तसंच त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानी जाऊन ते गणपतीचं दर्शन घेतील. लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला आणि त्यानंतर वांद्रे पश्चिमेतल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला शाह भेट देणार आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रासह कर्नाटकात ९० दिवसांसाठी किमान हमीभावानं सोयाबीन आणि उडीद या दोन पिकांसाठी खरेदी केंद्रं सुरू करायला केंद्र सरकारनं मान्यता दिली आहे. या दोन्ही राज्यांमध्ये सोयाबीनची किमान आधारभूत किंमत ४ हजार ८९२ रुपये प्रति क्विंटल इतकी निश्चित केली आहे. या निर्णयाबद्दल कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार यांचे आभार मानले आहेत.

**<><><><><>**

शासनाच्या विविध योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांना देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवण्यात येत आहेत. हे उमेदवार www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करू शकतात. माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयातर्फे राबवण्यात येत असलेल्या या उपक्रमात प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक, तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकांमागे एक, अशा प्रकारे राज्यभरात एकंदर ५० हजार योजनादूतांची निवड सहा महिन्यांसाठी केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रुपये मानधन मिळेल. १८ ते ३५ वर्षं वयोगटातले, महाराष्ट्राचं अधिवास प्रमाणपत्र असलेले कोणत्याही शाखेचे पदवीधर यासाठी अर्ज करू शकतात. अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख १३ सप्टेंबर आहे.

**<><><><><>**

गोंदिया विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी भाजपा राजीनामा दिला आहे. येत्या १३ तारखेला काँग्रेसमधे प्रवेश करणार असल्याची माहिती त्यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली. काँग्रेसकडून सलग पाचवेळा आमदार राहिलेले गोपालदास अग्रवाल यांनी २०१९मध्ये भाजपाच्या तिकिटावर विधानसभा निवडणूक लढवली होती, मात्र त्यांना पराभव पत्करावा लागला. गेल्या पाच वर्षांत भाजपात राहून गोंदिया विधानसभा मतदारसंघाचा हवा तसा विकास करता न आल्यानं आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेसमध्ये परतत असल्याचं अग्रवाल यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

गोंड, गोवारी जमातींना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अनुसूचित जमातीचे सर्व लाभ पूर्ववत सुरू करण्याबाबत शासनानं सात दिवसात निर्णय घ्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन सुरु करु, असा इशारा या समाजानं दिला आहे. या मागणीसाठी गोंदिया जिल्ह्यात आज विनोद अग्रवाल यांच्या घरावर गोंड गोवारी समाजानं त्यांच्या धडक मोर्चा काढला.

१९८५ च्या शासन निर्णयातली गोंड, गोवारी जमातीविषयी चुकीची माहिती तात्काळ दुरुस्ती करुन हे लाभ पूर्ववत सुरू करावेत, सेवानिवृत्त न्यायाधीश के एल वडने सर समितीला दिलेली मुदतवाढ रद्द करून सात दिवसाच्या आत या समितीचा अहवाल प्राप्त करावा, अशा मागण्यांचं निवेदन

अग्रवाल यांना देण्यात आले. यावेळी मोर्चेकऱ्यांनी सरकार विरोधी घोषणा देत १९८५ च्या शासन निर्णयाची होळी केली.

**<><><><><>**

गणेशोत्सवाचा आजचा दुसरा दिवस असून उत्सवाचा उत्साह सर्वत्र दिसत आहे. मुंबई पुण्यासह राज्यातल्या प्रमुख शहरांमधे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या भव्य आणि वैशिष्ट्यपूर्ण गणेशमूर्तींचं दर्शन घेण्यासाठी तसंच सामाजिक संदेश देणारे नेत्रदीपक देखावे पाहण्यासाठी गर्दी होत आहे. मुंबईत प्रसिद्ध लालबागचा राजासह इतर मंडळांचे गणपती बघण्याकरता भाविकांच्या रांगा लागत आहेत. विविध क्षेत्रातले मान्यवर सेलिब्रिटी, तसंच राजकीय नेतेमंडळी विविध मंडळांच्या गणपतींच्या दर्शनासाठी हजेरी लावत आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उद्या काही गणेशोत्सव मंडळांना भेट देणार आहेत. त्यात वांद्रे पश्चिम सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा समावेश आहे. दरवर्षी प्रसिध्द मंदिरांची हुबेहूब आरास साकारणाऱ्या या मंडळाने यावर्षी कन्याकुमारीच्या प्रसिध्द स्वामी विवेकानंद स्मारकाची ५२ फूट उंच हुबेहूब प्रतिकृती साकारली आहे.

**नाशिक** जिल्ह्यात सर्वत्र गणेशोत्सव उत्साहात साजरा होत आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात यंदा २ हजार ६०७ गणेश मंडळांना पोलीस खात्यानं परवानगी दिली आहे मात्र गावातील एकोपा टिकून राहावा यासाठी ८०४ गावांनी एकमतानं “आमचा गाव एक : आमचा गणपती एक” या तत्वावर एकच सार्वजनिक गणरायाची प्रतिष्ठापना केली आहे. यंदा पर्यावरण

पूरक गणेशोत्सवाला प्राधान्य देण्यात येत असून डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. नाशिक शहरातही गणेशोत्सव मंडळांनी यंदा विसर्जन मिरवणुकीत डीजे बरोबरच लेझर लाईट देखील वापरणार नसल्याचं पोलिसांनी आयोजित केलेल्या शांतता समितीच्या बैठकीत सांगितलं.

दरम्यान, दीड दिवसाच्या गणपतींच विसर्जन आज होत आहे. हे विसर्जन शांततेत आणि सुरक्षितरीत्या पार पडावं, यासाठी ठिकठिकाणी महानगरपालिका आणि इतर स्थानिक प्रशासनानं चोख व्यवस्था केली आहे.

श्रोते हो, पुण्यातून सुरू झालेला सार्वजनिक गणेशोत्सव आता आंतरराष्ट्रीय झाला आहे. विविध देशात गणेशोत्सव कशारितीने साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेणार आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८.०५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यांमध्ये, दररोज. आजच्या बातमीपत्रात आपण जाणून घेणार आहोत श्रीलंकेतला गणेश उत्सव.

**<><><><><>**

पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेचा समारोप सोहळा आज रात्री होणार आहे. या कार्यक्रमात भारताचा ध्वज, स्पर्धेतला सुवर्णपदकविजेता तिरंदाज हरविंदर सिंह आणि धावपटू प्रीती पाल यांच्या खांद्यावर असेल. या स्पर्धेत एकंदर २९ पदकांची कमाई करून भारतानं पदकतालिकेत अठरावं स्थान पटकावलं आहे. ७ सुवर्ण, ९ रौप्य आणि १३ कास्यपदकांसह भारतानं स्पर्धेच्या इतिहासातल्या आपल्या सर्वोत्तम कामगिरीची नोंद केली आहे.

<><><><><>

अमेरिकी खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीत बेलारूसच्या अरीना सबालेंका हिनं अजिंक्यपद पटकावलं आहे. आज झालेल्या अंतिम सामन्यात तिनं अमेरिकेच्या जेसिका पेगुला हिच्यावर ७-५, ७-५ अशी सरळ सेट्समध्ये मात केली आणि कारकीर्दीतलं तिसरं ग्रॅन्डस्लॅम अजिंक्यपद पटकावलं.

तत्पूर्वी पुरुष दुहेरीच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या मॅक्स पर्सेल आणि जॉर्डन थॉम्प्सन या जोडीनं जर्मनीच्या जोडीचा सरळ सेट्समध्ये पराभव केला.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात, कोकणात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी जोरदार पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी, तर विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली. या काळात कोकणात आणि घाट विभागात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//